**महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मर्यादित.**

''साखर भवन'', 11 वा मजला, प्लॉट नं. 230, ब्लॉक नं. 3,
बॅकबे रिक्लेमेशन, नरीमन पॉईंट, मुंबई – 400 021.
दूरध्वनी : 91 22 2204 2676 | 2901 | 4068 6900 | 6969 | 6998
ई-मेल : mahasugarfed@gmail.com
वेबसाईट : www.mahasugarfed.org | जीएसटी नं. : 27AAAAM0071E2Z2

सं.क्र.कामगार / निर्देशांक / 554 / 2023–24 **परिपत्रक** दि.27 / 12 / 2023

प्रति,
मा.कार्यकारी संचालक,
सर्व सभासद कारखाने.

विषय : **कामगारांच्या अखिल भारतीय सरासरी ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारीत 1 जानेवारी, 2024 पासून महागाई भत्त्यातील बदलाबाबत.**

महोदय,

महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि., डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशन आणि महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळ यांच्यात दि.21 / 1 / 1980 रोजी महाराष्ट्रातील साखर कामगारांचे वेतनमान इत्यादीबाबत महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री नाम.श्री.शरदचंद्रजी पवार यांनी दि.16 / 11 / 1979 रोजी दिलेल्या निवडयाच्या आधारे जो करारनामा करण्यात आला त्या करारातील कलम क्र.3 मध्ये खालील तरतूद आहे.

बदलणाऱ्या महागाई भत्त्यात 1 जानेवारी,1979 पासून दर तीन महिन्यांनी पुढीलप्रमाणे बदल करण्यात येईल.

(अ) प्रत्येक वर्षी 1 जानेवारी पासून मागील ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर हया तीन महिन्याच्या निर्देशकांच्या सरासरीच्या आधारे.
(ब) प्रत्येक वर्षी 1 एप्रिल पासून मागील नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी हया तीन महिन्यांच्या निर्देशकांच्या सरासरीच्या आधारे.
(क) प्रत्येक वर्षी 1 जुलै पासून मागील फेब्रुवारी, मार्च आणि एप्रिल हया तीन महिन्यांच्या निर्देशकांच्या सरासरीच्या आधारे.
(ड) प्रत्येक वर्षी 1 ऑक्टोबर पासून मागील मे, जून आणि जुलै हया तीन महिन्यांच्या निर्देशकांच्या सरासरीच्या आधारे.

वेळोवेळी राज्य पातळीवर साखर कामगारांच्या मागण्यांसंदर्भात झालेल्या करारानुसार वरील पध्दतीने सुधारीत दराने महागाई भत्ता कळविण्यात येतो.

आम्ही आपणांस कळवू इच्छितो कीं, मे 2023, जून 2023 आणि जुलै 2023 या तीन महिन्यांचे निर्देशांक पुढीलप्रमाणे आहेत आणि त्याप्रमाणे महागाई भत्त्यात खालीलप्रमाणे वाढ करावी ही विनंती.

| वर्ष | महिना | निर्देशांक बेस 1960 | निर्देशांक बेस 1982 | निर्देशांक बेस 2016–100 |
|---|---|---|---|---|
| 2023 | ऑगस्ट | 9150.8120 | 1856.1485 | 139.20 |
| 2023 | सप्टेंबर | 9039.0564 | 1833.4800 | 137.50 |
| 2023 | ऑक्टोबर | 9098.2211 | 1845.4809 | 138.40 |

तीन महिन्यांची सरासरी 9096.02 अंश म्हणजे **9096 अंश.**

सध्या महागाई भत्ता अखिल भारतीय सरासरी ग्राहक निर्देशांक 9002 प्रमाणे देण्यात येतो, म्हणजेच सध्याच्या सरासरी ग्राहक निर्देशांकात 94 (चौऱ्यान्नव) अंशांनी वाढ झालेली आहे.

त्रिपक्ष समितीच्या अहवालावर आधारित राज्य पातळीवर दि.4/10/2021 रोजी झालेल्या करारातील मुद्या क्रमांक 7 अखिल भारतीय ग्राहक किमंत निर्देशांक (1960 = 100) पायाभूत मानून प्रचलित करारानुसार महागाई भत्ता देण्यात येत आहे. दि.1/04/2019 पासून 6878 अंशाच्या वाढीव किंवा कमी झालेल्या प्रति अंशास रू.2.90 असा दर महागाई भत्ता देण्यासंदर्भातील तरतूद करण्यात आलेली आहे.

*माहे ऑक्टोबर 2023 ते डिसेंबर 2023 या तीन महिन्यासाठी सरासरी निर्देशांक 2124 अंशाकरीता महागाई रू.6159.60 देण्यात येत आहे.*

जानेवारी 2024 ते मार्च 2024 या कालावधीसाठी सरासरी निर्देशांक 2218 अंश येतो. तसेच मागील तिमाहीच्या सरासरी निर्देशांका पेक्षा सध्याच्या निर्देशांकात 94 अंशानी वाढ झाली आहे.

दि.4/10/2021 चे कराराचे तरतूदीनुसार 2218 अंशासाठी प्रति अंश रू.2.90 प्रमाणे महागाई भत्ता रू.6432.20 येतो. म्हणजेच मागील तिमाहीच्या तुलनेत 94 अंशानी निर्देशांकात वाढ झाली (94 अंश × रू.2.90 = 272.60) पगारात वाढ झाली आहे.

**दि.1/01/2024 ते 31/12/2024 या तिमाहीसाठी महागाई भत्ता रक्कम रु.6432.20 असा आहे.**

कृपया आपण योग्य ती कार्यवाही करावी अशी विनंती आहे.

कळावे,

आपला स्नेहांकित,

संजय खताळ
व्यवस्थापकीय संचालक

प्रत माहितीसाठी सादर :

1. मा.साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे–5.
2. मा.कामगार आयुक्त, कामगार आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, सी–20 सीटी पार्कच्या बाजूला, बांद्रा–कुर्ला संकुल, मुंबई–400 051.
3. मा.कार्यकारी संचालक, वेस्ट इंडिया शुगर मिल्स असोशिएशन, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे–5.
4. आर्थिक विभाग, संघ कार्यालय, मंबई.
5. संघ विभागीय कार्यालय, पुणे.
6. सरचिटणिस, महाराष्ट्र राज्य साखर प्रतिनिधी मंडळ, पुणे
   श्रीनिवास व्हीला, ए–34–12, एरंडवणा, पुणे – 411004.